वर्ष ४३
अंक १०

# बृहन्महाराष्ट्र वृत्त

बृहन्महाराष्ट्र मंडळाचे मुखपत्र

वृत्त 2.0

|| मराठी तितुका मेळवावा ||

On the Web
www.bmmonline.org

**समस्त मराठीप्रेमींसाठी उत्तर अमेरिकेतील एकमेव मराठी मासिक**

ऑक्टोबर २०२३
भाद्रपद/आश्विन
शके १९४५




नमस्कार प्रिय मित्र मैत्रिणींनो, गणपतीबाप्पा मोरयाच्या गजरात प्रत्येक मराठी मनात आनंद निर्माण करणारा आपल्या सगळ्यांचा लोकप्रिय गणेशोत्सव उत्तर अमेरिकेतील प्रत्येक मराठी घरात, प्रत्येक मंडळात, ढोल ताशाच्या जल्लोषात थाटामाटात साजरा झाला!

नियम व अटी लागू नाटकाचा दौरा जोरात सुरू आहे. एका लग्नाची पुढची गोष्ट या नाटकाचा दौरा पण सुरु होतोय. ५ आठवड्यात २१ प्रयोग! आणि फक्त मोठ्या शहरांमध्येच नाही बर का! तर डेलावेअर, कॅन्सस, पीट्सबर्ग, अशा लहान-मध्यम मंडळात देखील होत आहेत. बृहन्महाराष्ट्र मंडळामुळेच हे शक्य होतंय हे आपण सगळ्यांनी लक्षात ठेवायला हवे. माझ्यासारख्या ३०० कार्यकर्त्यांना उत्तर अमेरिकेत सामाजिक कार्य करायची ही संधी देखील बृहन्महाराष्ट्र मंडळामुळेच !

ऑक्टोबरमध्ये मराठी शाळांसाठी सत्यजित पाध्ये यांचा बोलक्या बाहुल्या कार्यक्रमाचा दौरा, नोव्हेंबर मध्ये अनिरुध्द जोशी यांचा दौरा व डिसेंबर मध्ये विच्छा माझी पुरी करा नाटकाचा दौरा! या वर्षी आपण ७ विविध प्रकारचे दौरे केले. कदाचित बृहन्महाराष्ट्र मंडळाचा हा रेकॉर्ड असावा असे मला वाटते. या सर्व आयोजनात मला भारतीय कार्यक्रम प्रमुख कार्यकर्ते नरेंद्र कल्याणकर व भाग्यश्री पटवारी यांचे व संपूर्ण संघाचे मनापासून अभिनंदन करावेसे वाटते. तसेच आपल्या मराठी कुटुंबासाठी सतत कार्यरत असलेल्या सर्व मंडळांचे अध्यक्ष, पदाधिकारी व कार्यकर्ते यांचे मन:पूर्वक अभिनंदन!

आणि हो, हे सर्व दौरे आपण बृहन्महाराष्ट्र मंडळ शैक्षणिक निधी उभारणीसाठी करत आहोत! पुढल्या वर्षी इयत्ता पाचवी ते बारावी मधल्या ५०० मराठी-अमेरिकन विद्यार्थ्यांना आपण कॉलेज ट्युशनसाठी प्रत्येकी $३०० देणार आहोत!

आत्तापर्यंत २७ मंडळांनी आपआपले युवा प्रतिनिधी नियुक्त केले आहेत - हे सर्व युवा प्रतिनिधी म्हणजे बृहन्महाराष्ट्र मंडळ युवा कौन्सिल. बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या युवा प्रकल्पात उत्तर अमेरिकेतल्या सर्व युवांना भाग घेता यावा म्हणून बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या युवा कौन्सिलला यांच्यातूनच पाच जणांची युवा समिती निवडून देण्यास सांगितले. निवडून आलेल्या समिती सभासदांची नावे: आरती करकर - युवा अध्यक्ष, आर्या भोइटे - युवा सचिव, केतकी नाईक - युवा खजिनदार, गार्गी बेरी - युवा संपादक, रेवती आठवले - युवा वेब/सोशल-मिडीया. या युवा समितीचे मनःपूर्वक अभिनंदन.

बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या काय बे २०२४ अधिवेशनाचे काम जोरात चालू आहे. २५०० हून अधिक जनरल तिकीट विक्री झाली आहे! तिकीटे फक्त मंडळांमधूनच खरेदी साठी उपलब्ध आहेत! तेव्हा तुमच्या मंडळ अध्यक्ष्यांशी लगेच संपर्क साधा.

सांख्य-कारिकेच्या एका श्लोकाने इथे थांबतो:

प्रकृतेः महान ततः अहंकारः तस्मात् गणश्च षोडशकः ।
तस्मात् अपि शोडषकात पंचभ्यः पंच भूतानि ॥

प्रकृतीतून महत, मग अहंकार, त्यातून सोळा घटक, सोळांमधल्या पाचातून पंच महाभूते

अर्थः महत म्हणजे या विश्वातली बुद्धी, अहंकार म्हणजे अस्तित्वाची जाणीव असणारा घटक, त्यातून सोळा घटक - ११ इंद्रिये व ५ तन मात्रं, ५ तन मात्रांतून ५ पंच महाभूते (पृथ्वी,जल, तेज, वायु, आकाश) अशी आपल्या विश्वाच्या निर्मितीची व्याख्या केलेली आहे

शुभेच्छा,

संदीप दीक्षित


संदीप दीक्षित
*अध्यक्ष, बृहन्महाराष्ट्र मंडळ २०२२-२४ / President, Bruhan Maharashtra Mandal (BMM) 2022-24*

+1 216-926-6696
sandeep.dixit@bmmonline.org
twitter.com/sandeepsdixit
www.bmmonline.org
bmm2.org/app


#bmm2 #bmm2024 #communityCentricBMM #mandalMember #vruttaSubscriber

**बृहन्महाराष्ट्र वृत्त**

बृहन्महाराष्ट्र मंडळ उत्तर अमेरिका या संस्थेचे मुखपत्र

स्थापना १९८१ (शिकागो)

संस्थापक:- कै . विष्णु वैद्य, कै . शरद गोडबोले, जयश्री हुपरीकर
अंकासाठी साहित्य/मजकूर पाठविण्याचा पत्ता:
ईमेल: vrutta@bmmonline.org
बृहन्महाराष्ट्र वृत्त कार्यालय संपर्क :-
BMM Treasurer - Rajan S Pednekar
20611 Whitebud CT. Tampa FL 33647
Ph- 813-546-1330
Email: Rajan.Pednekar@bmmonline.org
**वर्गणीचे दर**:- $25/ year
Subscription payment is accepted online by Paypal:
https://www.bmmonline.org/vrutta/subscription
**जाहिरातींचे दर:** पूर्ण पान: $175 अर्धे पान: $ 100
पाव पान: $ 70 अष्टमांश पान: $ 50

वृत्त दर महिन्याला प्रसिद्ध होते. आदल्या महिन्याच्या १५ तारखेपर्यंत आलेल्या मजकुरातून निवडक मजकूर नजीकच्या अंकात प्रसिद्ध करण्याचे सर्व प्रयत्न केले जातील. लेखासाठी जास्तीत जास्त १ ते २ पानांचा मजकूर मराठीत लिहून MS word मध्ये पाठवावा. प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतातच असे नाही. लिखाणाच्या निवडीचे, प्रकाशन योग्य किरकोळ बदलाचे आणि व्याकरणीय दुरुस्तीचे अंतिम अधिकार संपादकांकडे राहतील.

**बृहन्महाराष्ट्र मंडळाची कार्यकारिणी (२०२२ - २०२४)**
**मताधिकार असलेले सदस्य**

| | |
|---|---|
| अध्यक्ष: | संदीप दीक्षित, क्लिव्हलँड, ओहायो |
| सचिव: | अजित नातू, सॅक्रामेंटो, कॅलिफोर्निया |
| कोषाध्यक्ष: | राजन पेडणेकर, टॅम्पा बे, फ्लोरिडा |
| सदस्य: | अमर उऱ्हेकर, लिविंगस्टन, न्यु जर्सी |
| | सविता मोरे, वॉशिंग्टन |
| | मंजुषा नाईक, वेस्ट पाम बीच, फ्लोरिडा |
| | प्रसाद पानवळकर ऑस्टिन, टेक्सस |
| | विराज राऊत, सॅन होजे, कॅलिफोर्निया |

**नियुक्त सदस्य**

| | |
|---|---|
| माजी अध्यक्ष: | विद्या जोशी, शिकागो, इलिनॉय |

**विश्वस्त समिती**

| | |
|---|---|
| अध्यक्ष : | मोहित चिटणीस, सिऍटल, वॉशिंग्टन |
| सदस्य: | नितीन जोशी, शिकागो, इलिनॉय |
| सदस्य: | सुनील सूर्यवंशी, रिजफील्ड, कनेटिकट |
| प्रकाशक: | बृहन्महाराष्ट्र मंडळ, उत्तर अमेरिका |

**Disclaimer:** The advertised business is a wholly independent entity from Bruhan Maharashtra Mandal (BMM). BMM is neither liable nor responsible for any actions or communications between third parties and the advertised businesses, including parents and subsidiaries of the advertised businesses.

## या अंकात


| | |
|---|---|
| अध्यक्षीय | १ |
| बृ. म. मंडळ कार्यकारिणी व संपादक मंडळ | २ |
| बृ. म. मंडळ २०२४ अधिवेशन - अहवाल | ३ |
| वारसा | ४ |
| जाहिरात | ५ |
| टेक्सस प्रादेशिक क्रिकेट विजेतेपद स्पर्धा | ६ |
| कविता: प्रेमभाव | ७ |
| चिरकालीन उद्यासाठी भक्कम सेतुबंध | ८ |
| दिवाळी अंक २०२३ आवाहन | १० |
| जाहिरात | ११ |


## संपादक समिती

वृत्त संपादनाची धुरा नवीन संपादक मंडळाने हाती घेतली आहे. नवीन संपादक मंडळाची घडी बसेपर्यंत वृत्तच्या अंकात काही बदल दिसतील. तुमच्या सूचना ईमेलद्वारे जरूर कळवा.

**संपादक समिती**

अपर्णा कोळेकर
नीता धोपेश्वरकर
विदुला कोल्हटकर
अनिता कांत

कोमल कुलकर्णी
शुभदा सावरगावकर
शीतल रांगणेकर
राजन पेडणेकर


## वृत्त २०२३ दिवाळी अंक


वृत्ताच्या दिवाळी २०२३ अंकासाठी (नोव्हेंबर आणि डिसेंबरचा एकत्रित अंक) साहित्य (लेख, कथा, कविता, प्रवासवर्णन, पाकक्रिया, व्यंगचित्रे इ.) पाठवण्याचे उत्तर अमेरिकेतील आणि भारतातील देखील मराठी लेखकांना आम्ही आवाहन करीत आहोत. आवाहन अधिक माहिती हया अंकाच्या पान नंबर १० वर उपलब्ध आहे. **साहित्य पाठवण्याची अंतिम तारीख: १५ ऑक्टोबर, २०२३**

## बृहन महाराष्ट्र मंडळाच्या २०२४ सालच्या अधिवेशनाचा अहवाल

Email your entries to: *vrutta@bmmonline.org* before **Oct 15th.** Please add '*Diwali Ank*' in the email subject.

**स्मरणिकेतील साहित्यासाठी आवाहन:**




१) **जनरल विभाग** : सर्व प्रतिभावान लेखक, कवी, चित्रकार, मुलाखतकार मराठी प्रेमींचे पडसाद स्मरणिकेत उमटू दे. स्मरणिका आपल्या सगळ्यांची आहे.

२) **ज्येष्ठ विभाग** : वर्षानुवर्षे अमेरिकेत स्थायिक झालेल्या, सोशल मीडिया शिवाय अमेरिकेत रमलेल्या सर्व ज्येष्ठ लोकांचे अनुभव स्मरणिकेत उमटू देत. स्मरणिका तुमच्या सहभागाने सुंदर होणार आहे.

**अधिवेशनाचे निमंत्रक श्री. प्रकाश भालेराव यांची पुण्यात पत्रकार परिषद : सर्व आघाडीच्या मराठी वृत्तपत्रांनी घेतली विशेष दखल!**

दिनांक ८ सप्टेंबर रोजी पुणे येथे झालेल्या या पत्रकार परिषदेत श्री. भालेराव यांनी उपस्थित पत्रकारांना अधिवेशनाबद्दल माहिती दिली आणि आत्तापर्यंतच्या प्रगतीचा आढावा घेतला. सात हजारांहून अधिक मराठमोळ्या बृहन्महाराष्ट्रीयन लोकांची उपस्थिती अपेक्षित असलेल्या भव्य सोहळ्यात सहभागी होण्यासाठी महाराष्ट्रातील अनेकांनी तयारी सुरु केली आहे. बीएमएमचे प्रतिनिधी दिमाख सहस्रबुद्धे, पुणे जिल्हा सहकारी गृहनिर्माण संस्था आणि अपार्टमेंटस् महासंघ मर्यादितचे सुहास पटवर्धन हे देखील यावेळी उपस्थित होते.

**बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या २०२४ सालच्या अधिवेशनाच्या कार्यक्रमांसाठी मंडळांची विक्रमी नोंदणी:**

BMM2024 preferred सीटिंग च्या दृष्टीने मंडळ ब्लॉक tickets ची योजना सुरु झाली आहे.

**मंडळ ब्लॉक tickets ची योजना व नियम खालील प्रमाणे:**

- प्रत्येक ब्लॉक 24 जनरल tickets ($500/seat + 2% processing fee = $510/ seat - Total cost of Block $12,240) चा राहील.
- फक्त 10% ($1,240 per block) भरून आणि या तारखे प्रमाणे first come first serve, Center-to-right, Center-to-left आणि front to back या पद्धतीने assignments केल्या जातील
- बाकी payment करण्यासाठी मंडळाला दोन आठवडे मिळतील. वेळेमध्ये जर payment आले नाही तर मंडळ will lose its spot and get pushed back in the assignment order.

Benefits of block booking - after the full funding is received, the date and the time is stamped!

1) Preferred seating within the respective zones

2) Preferred access to available hotels until the capacity available is exhausted!

Moreover you get to sit together with friends and family!!!

Zelle your money to treasurer@bmm2024.org.
Or electronically transfer money to Chase Checking Account: 931002007
Routing Number: 322271627
Write your mandal name in the notes.

All these privileges are allocated on a first come first basis. Once we exhaust the capacity allocated, these privileges will be gone! For any additional information please contact Anjali Gandhi at +1 (925) 998-7557

**आता पर्यंत ८० blocks चे बुकिंग झाले आहे. त्वरा करा आणि आपापल्या मंडळातर्फे आपली जागा निश्चित करा.**

# बृहन्महाराष्ट्र मंडळाचा नवीन प्रकल्प "वारसा", Youtube मालिका

आजचा उत्तर अमेरिकेतील मराठी समाज कोण आहे हे समजून घ्यायचं असेल तर आपण कुठून आलो, का आलो, आणि इथल्या मातीत आपली मूळ रोवून कसे भरभराटीला आलो हे शोधले पाहिजे. त्याची नोंद करून ते जतन केले पाहिजे. अशा गोष्टी एकत्रित केल्या की सर्वांना आणि भावी पिढीला आपल्या प्रवासाची झलक मिळेल, त्यासाठी चालू केला आहे हा वारसा प्रकल्प.

**वारसा मालिका भाग 9 वा -**

**रंग माझा वेगळा, मार्ग माझा आगळा ...**



डॉ. शांताराम तळेगावकर, अमेरिकेत स्थलांतर १९७४ - सध्याचे वास्तव्य - रिचमंड व्हर्जीनिया

डॉ. तळेगावकर हे मूळचे ग्वाल्हेर संस्थानाचे. भारतातून वैद्यकीय शिक्षण पूर्ण केल्यानंतर १९६४ साली त्यांनी इंग्लंडला जाऊन रॉयल कॉलेज ऑफ सर्जनस् येथून FRCS केले. १९७४ साली येल युनिव्हर्सिटीतून आमंत्रण आल्यानंतर त्यांनी अमेरिकेला स्थलांतर करण्याचा निर्णय घेतला आणि Opthalmology मध्ये स्पेशलायझेशन केले. वैद्यकीय क्षेत्रात विद्वत्ता गाजवणारे डॉ. तळेगावकर हे मूळतः कलेमध्येच रमणारे. भारतामध्ये मिळालेल्या चित्रकला आणि संगीताचा वारसा अमेरिकेत जपत राहिले. भारतीय कलेचा इतिहास जाणून घेऊन त्याला अभ्यासाची आणि संशोधनाची जोड करत त्यांनी कला जोपासना सृष्टीत आपलं एक अलौकिक स्थान निर्माण केलं. Christie, Sotheby's अशा नावाजलेल्या संस्थांच्या लिलावांमध्ये भाग घेऊन त्यांनी आजवर अनेक भारतीय चित्रे आणि सांस्कृतिक मूल्य असणाऱ्या गोष्टींना त्यांनी आपलं केलं आहे. त्यापैकी काही निवडक पन्नास चित्रांचं प्रदर्शन व्हर्जीनिया म्युझियम ऑफ फाईन आर्ट्स मध्ये "The Talegaonkar Collection of Indian Paintings" या दालनात भरलं आहे. डिसेंबर 2023 पर्यंत खुल्या असणाऱ्या या दालनाला तुम्ही अवश्य भेट द्या अशी नम्र विनंती. डॉ. तळेगावकर यांच्या कला संग्रहाच्या प्रवासाची कथा त्यांच्या मुलाखतीत ऐकुया वारसाच्या नवव्या भागात “ मार्ग माझा वेगळा, रंग माझा आगळा..”

वारसा मालिकेचा हा अनोखा भाग (#9) " रंग माझा वेगळा, मार्ग माझा आगळा" पहाण्यासाठी खालील क्लिक (link) करा. किंवा तुमच्या mobile phone वरून इथे दिलेला QR code scan करा. ह्या Youtube channel ला जरून like आणि subscribe करा.

https://youtu.be/qkhRe2Xt7vU

Past Episodes:
https://www.youtube.com/@bmm-varasa




ATHARV WINS
"TOP EMERGING DEVELOPER"
Mumbai Suburban
Atharv
Redefining Vile Parle
THE TIMES GROUP
Atharv Infra LLP
OPTIMALMEDIA
HOSTED BY
TIMES OF INDIA
Witness the visionary leaders of Atharv Lifestyle as they proudly receive the Top Emerging Developer award. Their expertise and unwavering commitment have propelled us to new heights in real estate. Experience the allure of our remarkable creations that blend contemporary design with timeless aesthetics.
+91 7738866111 | sale@atharvalifestyle.com

## टेक्सस प्रादेशिक क्रिकेट विजेतेपद स्पर्धा

नुकत्याच ह्युस्टन टेक्सस मध्ये "टेक्सस प्रादेशिक क्रिकेट विजेतेपदाच्या स्पर्धा" पार पडल्या. यात टेक्सस मधल्या तीन मंडळांनी भाग घेतला होता: ह्युस्टन, ऑस्टिन आणि सॅन अँटोनियो. या प्रत्येक मंडळाकडून पुरुषांचे दोन संघ उतरले होते, तर ऑस्टिन आणि सॅन अँटोनियो तर्फे महिलांचा प्रत्येकी एक संघ उतरला होता.

या स्पर्धांचे नियोजन गेल्यावर्षी नोव्हेंबर मध्ये सुरू करण्यात आले. सर्वप्रथम प्रत्येक मंडळातून दोन-तीन प्रतिनिधी जमवून एक समिती स्थापन करण्यात आली आणि त्यांच्या बैठकांमधील झालेल्या चर्चेतून स्पर्धेचे नियम ठरवण्यात आले. यात अगदी कोणत्या कंपनीचा, तसेच कोणत्या रंगाच्या चेंडूने खेळायचे हे पण निश्चित करण्यात आले. नियमानुसार प्रत्येक मंडळ आपापल्या मंडळात त्यांची स्वतःची विजेतेपद स्पर्धा खेळवणार असे ठरले आणि मग सर्व मंडळांचे विजेते, तसेच उपविजेते ह्युस्टन येथे येऊन प्रादेशिक विजेतेपदासाठी लढणार असे ठरले.

त्यानुसार यावर्षी मार्च-एप्रिल महिन्यामध्ये स्थानिक मंडळांमध्ये सामने झाले. प्रथमच प्रायोजकांच्या सहाय्याने प्रत्येक संघाने टी-शर्ट बनवून घेतले व त्यावर बृहन्महाराष्ट्र मंडळाचा तसेच स्थानिक मंडळाचा लोगो, त्याचप्रमाणे पाठीमागे खेळाडूंची नावेही छापण्यात आली.

मे महिन्याच्या पहिल्या शुक्रवारी रात्री ऑस्टिन आणि सॅन अँटोनियो मधील सर्व संघ ह्युस्टन मध्ये दाखल झाले. दोन दिवसाच्या या सोहळ्यासाठी बृहन्महाराष्ट्र मंडळाचे अध्यक्ष संदीप दीक्षित यांनी खास उपस्थिती लावली. शनिवारी सकाळी आठ वाजता "कम्युनिटी आउटरीच - क्रिकेट उपक्रमाचे" प्रमुख, सचिन कापसे, यांनी फलंदाज संदीप दीक्षित यांना गोलंदाजी करून या क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन केले. यानंतर वेगवेगळ्या संघांमध्ये सामने सुरू झाले. तंबूमधून मित्रमंडळी आणि कुटुंबीयांचा जल्लोष जोरात ऐकु येत होता. दुपारी ऑस्टिन आणि सॅन अँटोनियो महिला संघाचा दुसरा सामना झाला आणि ऑस्टिन महिलांच्या संघाने विजय मिळवून "टेक्सस प्रादेशिक महिला क्रिकेट विजेतेपदाचा करंडक" पटकावला.

दुसऱ्या दिवशी, म्हणजे रविवारी सकाळी, सामने सुरू झाले. मात्र पहिल्या सामन्याच्या शेवटी हलका पाऊस सुरू झाला. तो सामना संपल्यावर मात्र पावसाने जोर पकडला आणि म्हणता म्हणता धो धो पाऊस सुरू झाला. यावेळी सर्व कप्तानांची बैठक घेऊन उर्वरित सामने उन्हाळ्याच्या सुट्टीनंतर, १९ ऑगस्टला खेळवायचे असे ठरले. उन्हाळ्याच्या सुट्टीनंतर खेळाडू परत एकदा ह्युस्टनला जमले. यावेळी सकाळी दोन उपांत्य फेरीतील सामने झाले आणि दुपारी जेवणानंतर अंतिम सामना खेळला गेला.

अंतिम सामन्यात ह्युस्टन च्या शिवनेरी संघाने ह्युस्टनच्याच सिंहगड संघाचा पराभव करत "टेक्सस प्रादेशिक क्रिकेट विजेतेपदाचा करंडक" पटकावला.

या स्पर्धा एकंदरीत खूप खेळीमेळीच्या वातावरणात पार पडल्या, त्याबद्दल सर्व खेळाडूंचे, मंडळातील पदाधिकाऱ्यांचे, स्पर्धा संयोजकांचे, तसेच प्रायोजकांचे अभिनंदन!

उत्तर अमेरिकेत काही ठिकाणी अशा स्वरूपाच्या स्पर्धा चालू आहेत किंवा आयोजन करण्याचे प्रयत्न चालू आहेत. याचा पुढील टप्पा म्हणजे पुढील वर्षीच्या संमेलनाच्या आधी, राष्ट्रीय स्तरावर, अशा प्रकारची क्रीडा स्पर्धा आयोजित करणे असे आहे आणि त्या संदर्भातली बोलणी सध्या चालू आहेत. अधिक माहितीसाठी तुम्ही आम्हाला संपर्क साधू शकता.



**(डावीकडून: प्रसाद पानवळकर, संदीप दीक्षित आणि सचिन कापसे)**

- प्रसाद पानवळकर, कम्युनिटी आउटरीच प्रमुख





## प्रेमभाव

चंचल ललना, कातल नयना
स्मरण तयाचे, वेड लावतो
मनात अलगद गुदगुदणारा
लाडिक अल्हड प्रेमभाव तो

कांती नितळ, काया पातळ
देहामधूनी, मधू वाहतो
गंध तयाचा माखुन घ्याया
मी चातकी वाट पाहतो

कवेत घ्यावे, हवेत जावे
प्रेम धुंदीच्या दवात न्हावे
ओठांना मग ओठ भिडवूनी
निशब्द राहूनि समरस व्हावे

कुशीत तुझिया हळूच शिरावे
तू अन मी मग एकच व्हावे
रोम रोम हे जावे पेटुन
द्यावे घ्यावे प्रेम-पुरावे

मन वेडे झाले स्पर्शाखातर
अश्वासम मग उधळत रहाते
तुझिया संगे प्रेमायुष्याची
दिस-रातीला स्वप्न पहाते

फक्त एकदा ...
फक्त एकदा येऊन बघशील
बहरून जाईल स्वप्न गाव तो
अन प्रिये तुलाही उमजून जाईल
व्यथित मनीचा प्रेम भाव तो

\- दिनेश मदने

# चिरकालीन उद्यासाठी भक्कम सेतुबंध
## ज्ञान प्रबोधिनी फौंडेशन

“Building bridges for sustainable future” हे बोधवाक्य मनावर कोरून चार वर्षांपूर्वी आम्ही ज्ञान प्रबोधिनी फौंडेशन ही संस्था अमेरिकेत स्थापन केली. अमेरिकेतील आणि भारतातील प्रकल्पाना आणि उपक्रमांना मदत करण्यासाठी.. विशेषतः भारतात ज्यांना उद्याची चिंता आहे त्यांचा ‘उद्या’ उज्जवल करण्यासाठी आपला ‘आज’ चा वेळ आणि शक्ती देण्याची तयारी असलेले आम्ही सुमारे २०० युवक. बरेच तिशीतले.. विद्यार्थी तरी किंवा आपले बस्तान बसवण्यासाठी धडपडणारे तरी. काही माझ्यासारखे मनाने चिरतरुण आणि निवृत्तीनंतरचा वेळ सत्कारणी लावण्यासाठी धडपडणारे.

शिक्षण, ग्रामीण विकास आणि महिला नेतृत्व ही क्षेत्रे म्हणजे ज्ञान प्रबोधिनी फाउंडेशनच्या कार्याची केंद्रस्थाने तर दीडशेचे वर समर्पित स्वयंसेवकांचा भक्कम पाठिंबा हे ज्ञान प्रबोधिनी फौंडेशनचे बलस्थान!

ज्ञान प्रबोधिनी (पुणे, निगडी, सोलापूर, हरळी, अंबाजोगाई आणि साळुम्बरे) ही महाराष्ट्रातील प्रथितयश संस्था हे आमचे आधारस्थान! या संस्थेच्या अनेक प्रकल्पांना सहाय्य देण्यासाठी आम्ही तत्पर असतो.

आमचे सर्व काम whats app आणि virtual meeting मधून चालते. त्यामुळे आमच्या सगळ्या समित्यांवर अमेरिकेच्या वेगवेगळ्या राज्यातले स्वयंसेवक काम करू शकतात आणि बँक ट्रान्सफर, website इत्यादि खर्च सोडला तर overheads काही नसतात. म्हणजे ९८ टक्के निधी प्रकल्पासाठी वापरता येतो. आतापर्यंत ज्ञान प्रबोधिनी फौंडेशनच्या स्वयंसेवकांनी केलेल्या कामाच्या स्वरूपाची मांडणी मुख्यत्वे चार विभागात करता येईल.

ते म्हणजे संघटन (network), प्रकल्प समायोजन (project coordination), निधिसंकलन (fund raising) आणि प्रसार व प्रचार( publicity and outreach )

**संघटन:** या म्हणजे JPGN (ज्ञान प्रबोधिनी ग्लोबल नेटवर्क) उपक्रमात जगभरातले युवक भाग घेतात. कोविड नंतरच्या काळात उपक्रमांद्वारे व्यक्तिशः भेटींना ज्ञान प्रबोधिनी फाउंडेशन मध्ये प्राधान्य दिले गेले. त्यातून मैत्री होते. एकमेकांच्या अडीअडचणी समजतात. काम करण्यासाठी माणसे जोडली जातात. आमचा whats app वर student support group आहे. विद्यार्थ्यांच्या अडचणी निवारण्यासाठी मदत आणि त्यांच्यासाठी आधारयंत्रणा म्हणजे सपोर्ट सिस्टिम आहे. नोकरी गेली तर मदत नवीन मिळवण्यासाठी या गटाची मदत होते. उदाहरण द्यायचे तर २०२२ साली ८६ मेळावे आयोजित केले. त्यातील ८५ मेळावे लोकांच्या प्रत्यक्ष उपस्थितीत झाले. त्यामुळे एकूण ५४४ सदस्य एकमेकांना भेटले आणि जोडले गेले. “JPF corporates” असाही एक गट आता सुरु झाला आहे.

**प्रकल्प समायोजन :** ज्ञान प्रबोधिनी फौंडेशनची प्रकल्प समायोजन समिती विविध प्रकारचे कार्यक्रम चालवते. त्यात

- भारतातल्या मुलांना इंग्लिश संभाषण (beyond language barriers) शिकवणे
- ज्ञान प्रबोधिनी पुणे यांच्या शैक्षणिक साहित्याचे भाषांतर करून ते महाराष्ट्राबाहेरच्या शिक्षणसंस्थाना उपलब्ध करून देणे
- प्रेरणासेतू म्हणजे मुलांना करियरसाठी मार्गदर्शन करणे
- बालप्रबोधिनी म्हणजे मुलांसाठी संस्कार वर्ग चालवणे
- अमेरिकेत नोकरीसाठी मार्गदर्शन, resume writing workshops
- JPF Analytics म्हणजे संशोधन उपक्रम चालवणे हा एक ‘Computational Social Science Platform’ आहे.

या समितीत सर्वाधिक म्हणजे शंभरहून अधिक स्वयंसेवक काम करतात.

प्रकल्प समायोजनाचा आणखी एक महत्वाचा भाग म्हणजे भारतातील शिक्षण, ग्रामीण विकास आणि महिला नेतृत्व या क्षेत्रातील प्रकल्पाची पाहणी, मार्गदर्शन आणि पाठपुरावा. त्यासाठी काही स्वयंसेवक भारतातील ज्ञानप्रबोधिनीच्या त्या त्या विभागांशी संपर्क ठेवतात आणि प्रकल्पाची पाहणी करतात.

२०२३ च्या एप्रिल आणि मे मध्ये महाराष्ट्रात जाऊन मी दोन महिने हे काम केले. प्रत्येक गावात आणि प्रत्येक प्रकल्पाला भेट दिली. अडचणी समजून घेतल्या. ज्यांच्यापर्यन्त आपली मदत पोहोचते, त्या लोकांपर्यंत जाऊन त्यांच्याबरोबर गप्पा मारल्या. सुमारे पाचशे लोकांच्या या जनता जनार्दनाचे दर्शन मला समृद्ध करून गेले. कोणत्याही प्रकल्पाचा पाठपुरावा करून आपण आपल्या देणगीदारांना उत्तरदायी राहिलं पाहिजे ही आमची भूमिका आहे.

**निधिसंकलन :** महाराष्ट्र आणि विशेषतः: ईशान्य भारतात ज्ञान प्रबोधिनीचे कार्य चालू आहे. विविध प्रकल्पासाठी आर्थिक मदत उभारण्याचे मोठे काम निधिसंकलन विभागाचे. आमच्या स्वयंसेवकांनी पाचशेपेक्षा अधिक देणगीदारांपर्यंत पोहोचून चार वर्षात सुमारे ५००,०००$ आणि २८ प्रकल्प उभे केले. आरोग्य सखी, बिडी मुक्ती आणि learn India अशा मोहिमा चालू आहेत. आता आम्ही अमेरिकेतील काही संस्थांबरोबर सहकार्यातून विकास म्हणजे partnership in development असा उपक्रम सुरु केला आहे. काही मराठी मंडळे आमच्याबरोबर काम करत आहेत.

**प्रसार व प्रचार:** जगभर प्रवाहित असणाऱ्या माहिती आणि संपर्क माध्यमांद्वारे अनेक देशात ज्ञान प्रबोधिनीचे अस्तित्व प्रस्थापित करणे, ज्ञान प्रबोधिनीचे महाजालीय कार्यालय चालवणे हे काम आमच्या प्रसार आणि प्रचार विभागाचे. संकेतस्थळ आणि अन्य सामाजिक माध्यमे सतत जागृत ठेवण्याचे काम हा विभाग सातत्याने करत असतो. बृहन्महाराष्ट्र मंडळाचे अधिवेशन, मराठी मंडळाचे कार्यक्रम अशा ठिकाणी ज्ञान प्रबोधिनी फौंडेशन तर्फे प्रचार दालन म्हणजे बूथ ठेवले जातात.

ज्ञान प्रबोधिनी फौंडेशनचे १५० चे वर स्वयंसेवक आणि त्यांचे १३,००० चे वर तासांचे काम हे आकडे बोलके आहेत. अवघ्या चार वर्षात एवढी मोठी घोडदौड हे ज्ञान प्रबोधिनी फौंडेशनच मोठं यश आहे. त्याच रहस्य आहे या संस्थेच्या सांस्कृतिक बांधणीत! इथे तरुणाईचा उत्साह आहे. कोणाचाही व्यक्तिगत स्वार्थ, झेंडा किंवा अजेंडा नाही. कार्यकारिणीचे काम सहविचारात्मक नेतृत्व (Consultative leadership) या पद्धतीने चालते. त्यामुळे कोणीच मोठा नाही. कोणी छोटा नाही. प्रत्येकाला आपली कौशल्ये आणि प्रतिभा फुलवून काम करायचं स्वातंत्र्य आणि मोकळेपणा आहे. कोणत्याही राजकीय, धार्मिक किंवा तात्विक विचारसरणीशी आमची बांधिलकी नाही. आमची बांधिलकी आहे मानवतेला!

मूळचे स्वयंसेवक जरी ज्ञान प्रबोधिनीचे विद्यार्थी आणि हितचिंतक असले तरी स्वयंसेवक म्हणून काम करण्याची इच्छा असलेल्या कोणाचेही येथे स्वागत होते. बारा वर्षांपासून ते नव्वद वर्षापर्यंत सर्व वयाच्या स्वयंसेवकांचे ज्ञान प्रबोधिनी फौंडेशन हे एक कुटुंब आहे.

- विद्या हर्डीकर सप्रे

## आगामी नाटके

BMM 2.0 | India Programming




| | |
|---|---|
| Friday, Sep 8 | Seattle |
| Saturday, Sep 9 | New Jersey |
| Sunday, Sep 10 | Delaware |
| Monday, Sep 11 | Open |
| Friday, Sep 15 | Open |
| Saturday, Sep 16 | Bay Area |
| Sunday, Sep 17 | Kansas City |
| Monday, Sep 18 | Open |
| Friday, Sep 22 | DC |
| Saturday, Sep 23 | Cleveland |
| Sunday, Sep 24 | Chicago |
| Monday, Sep 25 | Open |

BMM Educational Endowment Fundraising Tour

| | |
|---|---|
| Friday, Sep 29 | Open |
| Saturday, Sep 30 | Dallas |
| Sunday, Oct 1 | Raleigh |
| Monday, Oct 2 | Open |
| Friday, Oct 6 | Pittsburgh |
| Saturday, Oct 7 | Orlando |
| Sunday, Oct 8 | Tampa |

BMM 2.0 | India Programming




| | |
|---|---|
| Friday, Sep 29 | Open |
| Saturday, Sep 30 | Chicago |
| Sunday, Oct 1 | St Louis |
| Monday, Oct 2 | Open |
| Friday, Oct 6 | Dallas |
| Saturday, Oct 7 | Raleigh |
| Sunday, Oct 8 | Bay Area |
| Monday, Oct 9 | Open |

BMM Educational Endowment Fundraising Tour

| | |
|---|---|
| Friday, Oct 13 | Austin (Tentative) |
| Saturday, Oct 14 | Houston |
| Sunday, Oct 15 | South Florida |
| Monday, Oct 16 | Open |

BMM 2.0



YUVA

### BMM Educational Endowment

**Disbursement only towards College Tuition for Marathi American Yuva**

**Goal: Two Million Dollars by June 2024**

**Fundraising Packages**

| Student Sponsorship | $ |
|---|---|
| 1 | 300 |
| 5 | 1500 |
| 10 | 3000 |
| 100 | 30000 |

Scan for more info

Pay: Zelle.edu@bmmonline.org
Contact: endowment@bmmonline.org

**राशिभविष्य : ऑक्टोबर २०२३**

**दादा दामले (न्यू जर्सी)**

https://bmmonline.org/rashi-bhavishya/

## वृत्त दिवाळी अंक २०२३ साठी आवाहन

नमस्कार मंडळी,

बीएमएम वृत्त तर्फे प्रसिद्ध होणाऱ्या दिवाळी अंकाला या वर्षी ४२ वर्षं पूर्ण होत आहेत, ही अभिमानास्पद बाब आहे! बृ. म. मं. वृत्ताचा दिवाळी अंक - नोव्हेंबर आणि डिसेंबरच्या संयुक्त अंकासाठी आम्ही नॉर्थ अमेरिका स्थायिक तसेच, भारतातील देखील मराठी लेखक, कवी, चित्रकार, व्यंगचित्रकारांना अभिरुचीसंपन्न साहित्य व दर्जेदार कलाकृती पाठविण्याचे आवाहन करीत आहोत. या अंकाला वैविध्यपूर्ण बनविण्यासाठी आपले लेख, कविता, नर्म विनोद, चुटके, हास्यचित्रे, प्रवास वर्णन आणि चविष्ट पाककृती सुद्धा जरूर पाठवाव्यात.

**साहित्य पाठवण्याची अंतिम तारीख: ऑक्टोबर १५, २०२३**

**अपेक्षित साहित्य व शब्दमर्यादा:**

* कथा, लेख, निबंध: १००० शब्द (फोटो रहित )

*कथा, लेख, निबंध: ६०० शब्द (फोटो सहित )

* चुटके: १५० शब्द

* पाककृती, संकीर्ण उपयुक्त माहिती: ३०० शब्द

* कविता: २० ओळ

*अंकासाठी स्वीकारलेल्या साहित्यापैकी उत्कृष्ट साहित्याला किंवा कलाकृतीला 'संपादकांची पसंती' हे पारितोषिक निवड समितीने केलेल्या निर्णयानुसार देण्यात येईल.*

### साहित्य पाठवण्याचे नियम -

1. साहित्य आपले स्वत:चे असावे आणि इतरत्र प्रकाशित झालेले नसावे.
2. रुपांतरित किंवा अनुवादित साहित्यावर मूळ लेखकाच्या नावासह तसा उल्लेख असणे आवश्यक आहे.
3. साहित्याच्या निवडीत निवड समितीचा निर्णय अंतिम राहील. निवडलेल्या साहित्यात मोजकेपणा, सुस्पष्टपणा आणि शुध्दलेखन यांच्या दृष्टीने आवश्यक ते बदल करण्याचा हक्क संपादकांना राहील.
4. प्रिंटरच्या तांत्रिक चुकींसाठी संपादक मंडळ वा प्रकाशक जबाबदार राहणार नाही.
5. लेखकांनी साहित्याबरोबरच स्वत:चा संपूर्ण पत्ता, फोन नंबर आणि ई-पत्ता (email address) पाठवणे आवश्यक आहे.
6. निवड न झालेले साहित्य परत पाठवले जाणार नाही.

*A word file should be emailed to vrutta@bmmonline.org While sending email, please have the email Subject added as "Diwali Ank"

टीप: http://www.google.com/ transliterate या वेबसाईटवर मराठीमध्ये टाईप करता येते. नंतर ते Microsoft Word मध्ये copy करून, save करून किंवा email मध्ये copy करून vrutta@bmmonline.org ह्या address वर पाठवावे.

**जाहिराती आणि शुभेच्छा संदेश :** जाहिरातीचे दर:

Full Page: $400

Half Page: $250

Quarter Page: $125

BMM वृत्तात जाहिरात किंवा शुभेच्छा संदेश देण्यासाठी संपर्क साधावा- email-Rajan.Pednekar@bmmonline.org; Vrutta@bmmonline.org

आपली मुद्रणसिध्द जाहिरात किंवा शुभेच्छा संदेश 'वृत्त दिवाळी अंक' साठी **ऑक्टोबर १५, २०२३** च्या आत मिळणे आवश्यक आहे.

### वृत्त दिवाळी अंकासाठी मदत करायची इच्छा आहे?

मॅगझीन वर काम करायचा पूर्वीचा अनुभव असल्यास आणि वृत्त दिवाळी अंकास मदत करण्याची इच्छा असल्यास संपर्क साधावा: Vrutta@Bmmonline.org

### Youth Corner: (age 5 to 18 years):

Vrutta team invites the second generation of Marathi American authors, poets and artists to contribute to the 'Youth Corner' section of 'Vrutta Diwali Ank 2023', our annual Diwali Magazine. Send your articles, stories written in English OR Marathi. You can also send your drawings and artwork.

**All youth articles should be submitted before October 15th 2023 to vrutta@bmmonline.org.** Your name, age and email address may be included with your submission. While sending email, please have the Subject added as "Diwali Ank"

**आभारी आहोत,**

**बीएमएम वृत्त टीम**

## NAMASKAR

Charity giving to any entity in India is now easy with Foundation for Small Charities India, Inc. (FSCI) Granted by IRS A (501 (C)(3) Tax Exempt Status. An affiliate 'Foundation for Small Charity' (FSC) has the 80-G and FCRA required Registration in India, allowing you to give at will, without any red tape. India recipients of your giving need not be a registered charity. Your school or college never attempted to obtain tax exemption in India, which is very expensive.

We welcome repatriation of after-tax sales proceeds of realty by US Citizens of Indian origin. We will honor remittance of tuition fees by parents to colleges in the USA for their children from India.

**FSC is the answer.**
**Visit our Website "WWW.SmallCharity.Org", for more detail.**

**Or email to Admin@SmallCharity.Org .**

You will hear from Ramesh Sarva, CPA, 183 Broadway, #210, Hicksville NY 11801

## Join Donor List:

JAGDISH & SHUBHANGI THAKUR
RAVI & NILIMA BHIRUD
RAHUL & PUNAM MUTHA
KOTESWARA RAO KUNDA, MD
KIRAN& NNDINI JOAG
KISHOR DANDEKAR
SUBHASH & VASANTI PURANIK
SUHASINI JOSHI
KAMLAKAR &ARUNA PENDSE
PRAMILA SARVA
VIJAY NARINGREKAR
MUKUND & SHAILA DIDOLAKE
GOVIND & BHAKTI NADKARNI

SHARAD PANJAPE
KAMALAKAR PENDSE
SUHASINI JOSHI

SWAROOP YOG & OTHER CHARITIES
M. KARVE FONDN 16 NEW GIRLS EDU
ANAND RISHI Hosp. C T SCAN
EDUCATIONAL FOUNDATION, A.P.
V.T. PATIL FOUNDATION
AMPTE FOUNDATIO
CASP, V.S. SAMITHI, PUNE, PATHAK RST
KOSMIC BEATS
ATHASHREE
ADHAR
EDUCTION
AKKA DHOPESWAR MAHILA MANDAL
SHANTA DUEGA TEMPLE, KAVLEM, GOA
LD ENGG COLLEGE, LIBRARY REDEVALOPMENT
ATHASHREE, IMROVE FACILITIES FOR SENIORS
ATHASHREE
COSMIC BEATS

# बृहन्महाराष्ट्र वृत्त

|| मराठी तितुका मेळवावा ||

**Subscription Remittance Address:**
**BMM Newsletter**
**20611 Whitebud CT.**
**Tampa FL 33647**

BMM
बृहन्महाराष्ट्र मंडळ



नाते जुळते मनाशी मनाचे




Reshimgathee
A BMM Matrimonial Initiative for
Maharashtrians in North America

https://reshimgathee.bmmonline.org/




Five-level "Marathi Language Learning"
progressive curriculum,
study guidelines, and
supporting materials
the BMM-Bharati Vidyapeeth's
joint certificates for
"Marathi Bhasha" examinations
after successful completion of
each level and passing criteria.
For BMM Marathi Shala Inquiries,
Email:- shala@bmmonline.org
https://bmmshala.net/